जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 AUG 2019
तरुण भारत

# शिक्षण क्षेत्राच्या माणुसकीचे दर्शन

पान १ वरुन

न्यू कॉलेज एनसीसीच्या विद्यार्थीनी व १ महाराष्ट्र बटालियनच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्याचबरोबर लक्ष्मीपुरी येथील अंबाबाई विद्यालयातील पूरग्रस्तांना सलग चार–पाच दिवस जेवण, पाण्यासह जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. स्वच्छतेसह समुपदेशनातून मानसिक दिलासा दिला. या एनसीसी विद्यार्थ्यांचे नेतृत्व मेजर डॉ. रूपा शहा यांनी केले. एनसीसीचे केवळ कॅम्प होत नाही तर समाजकार्यात त्यांची मदत होते, हे या आपत्तीतून स्पष्ट झाले.



कोल्हापूर : महापुरानंतर एनएसएसच्या विद्यार्थ्यांसोबत स्वच्छता करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

**शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठाने पूरग्रस्तांच्या राहण्याची खाण्याची सोय केली. तसेच पूरग्रस्तांच्या जनावरांना मोफत चाराही दिला. महापुराच्या पाण्यामुळे शहराचा पाणीपुरवठा खंडीत झाला होता. त्यामुळे शहरातील लोकांना पिण्याच्या व वापराच्या पाण्याचा पुरवठा केला. ज्यांची दप्तर पाण्यात कुजले अशा विद्यार्थ्यांना वह्या–पुस्तकांचा पुरवठा केला आहे.

**'आम्ही शिक्षक चळवळ'**

'आम्ही शिक्षक चळवळ' यांच्या वतीने पूरग्रस्त ५०० कुटुंबाना धान्य कीट मदतीच्या स्वरूपात दिली आहेत. एक शिक्षक एक कुटुंब या संकल्पनेतून जवळपास १० लाख रूपयांचा निधी जमा झाला. यातून धान्य, कपडे, साड्या, कोलगेट, ब्रश, साबण, तेल, ब्लँकेट आदी वस्तूंचे कीट तयार करण्यात आले आहे.

**एक हात मदतीचा.. पुरोगामी शिक्षक परिवाराचा**

एक हात मदतीचा.. पुरोगामी शिक्षक परिवाराचा या सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत ६ लाखाचा निधी जमा करून महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेच्या वतीने कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील जवळपास एक हजार पुरग्रस्त कुटुंबांना जिवनावश्यक वस्तुंचे किट वाटप करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 AUG 2019

तरुण भारत

# शिक्षण क्षेत्राच्या माणुसकीचे दर्शन

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

कोल्हापूरात आलेल्या महापूराच्या संकटात कोल्हापूरातील माणुसकीचे दर्शन घडले. यावेळी कोल्हापूरचे शिक्षण क्षेत्रही मागे राहिले नाही. विविध शिक्षक संघटनांसह, एनएनएस, एनएनसी च्या विद्यार्थ्यांनी मदत व बचाव कार्य केले. महापुराच्या काळात शिक्षण क्षेत्रातील संघटनांकडून झालेल्या कार्याचा हा आढावा.

- ३ हजार विद्यार्थी पूरग्रस्त गावांच्या सेवेत
- स्वच्छता अभियानात एनएसएस, एनसीसीचा सहभाग
- शिवाजी विद्यापीठाची मदतकार्यात मोलाची भूमिका

### एनएसएस

राष्ट्रीय सेवा योजनेचे जानेवारी–डिसेंबरमध्ये होणारे कॅम्प रद्द करून पूरग्रस्त खेड्यात कॅम्प सुरू केला. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील पूरग्रस्त गावे दत्तक घेतली आहेत. स्वच्छता अभियानाची सुरूवात १५ ऑगस्टपासून कोल्हापूरात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत झाली. जिल्हा प्रशासन, आरटीओ, जिल्हा परिषद, रोटरी क्लब यांच्या सहकार्याने जवळपास एनएसएसचे ३ हजार विद्यार्थी पूरग्रस्त गावांच्या सेवेत रूजू झाली आहेत. एसएसएसचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यार्थ्यांची विद्यापीठातील वसतिगृहात राहण्याची व जेवणाची सोय केली असून, जिल्हा प्रशासनाच्या वाहनातून दररोज दत्तक गावात जावून स्वच्छता अभियान राबवत आहेत. हे अभियान १ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

पूरस्थितीतही १६ हजार विद्यार्थ्यांनी कोल्हापूर सेंट्रल किचन, बचाव कार्यात काम करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. यापुढेही वर्षभर एनएसएसचे विद्यार्थी श्रमदानातून पूरग्रस्त गावांना सहकार्य करणार आहेत.

### एनसीसी

अस्मानी संकटात एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी बचावकार्यात महत्वाची भूमिका बजावली. आंबेवाडी, चिखली, शहरातील काही भागात पूरग्रस्तांना सूरक्षितपणे महापुराच्या पाण्यातून बाहेर काढण्यास मदत केली.

विविध ठिकाणी अडकलेल्या प्रवाशांना रोटरी क्लब ऑफ सनराईजच्या माध्यमातून जेवण, पाण्यासह आवश्यक वस्तू पूरवण्याचे काम एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी केले. यामध्ये ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनमधील, महावीर कॉलेज, कॉमर्स कॉलेज,

पान ६ पहा

पुढारी




कोल्हापूर : मोडी अभ्यासक उदयसिंह राजे यादव यांच्या मोडी भाषेतील पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. प्रताप पाटील, विजय सिंघण आदी उपस्थित होते. (छाया : नाज ट्रेनर)

# इतिहासाचा अनमोल ठेवा मोडी कागदपत्रांत

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : मोडी ग्रंथांचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इतिहासाचा अनमोल ठेवा मोडी कागदपत्रांत लपला आहे. त्याच्या जतन-संवर्धन-संरक्षणासाठी मोडी भाषेचे ज्ञान अत्यावश्यक आहे. हे ज्ञान लोकांना मोडी अभ्यासक उदयसिंह राजेयादव यांच्या मोडी भाषेतील पुस्तकांतून मिळत आहे. अशा पुस्तकांमधून लोकांना मोडीची गोडी वाढेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

राष्ट्रीय इतिहास मोडी प्रबोधिनी व श्रीमंत राजेयादव चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने 'शंभर वर्षांपूर्वीची पोस्टकार्ड मोडी पत्रे', 'क्रीडा विश्व भाग २' या पुस्तकांचे प्रकाशन गुरुवारी महालक्ष्मी धर्मशाळा येथे झाले. यावेळी पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाचे प्रा. डॉ. रत्नाकर पंडित, वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील आदी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कमी शब्दात व्यक्त होणे म्हणजे पोस्टकार्ड. मोडीतील प्रत्येक पोस्टकार्डला संदर्भ ग्रंथाचे महत्त्व आहे. डॉ. रत्नाकर पंडित यांनी, जितके महत्त्व मोडी कागदपत्रांना देणे गरजेचे आहे, तितके मिळाले नसल्याचे सांगितले.

लेखक उदयसिंह राजेयादव यांनी मोडी लिपीतील पोस्ट कार्डसचे महत्त्व सांगून त्यांच्या जतनासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. यासाठी मोडी भाषा शिकण्याची मोहीम व्यापक करणे गरजेचे असल्याचे सांगितले. स्वागत, प्रास्ताविक मोडी अभ्यासक विजय सिंघण, सूत्रसंचालन मीरा उत्पात, विजय जाधव यांनी केले.